भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.६०८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०८/२०१७

**१) अर्भक मुलाचे प्रेत विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने फेकुन दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २९/०८/२०१७ चे रात्री दर.यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने दि.२९/०८/२०१७ चे रात्र दरम्यान तिला मुल जन्मले हे गुप्तपने ठेवुन, त्या मृतक अर्भक मुलाचे प्रेताची विल्हेवाट लावण्याचे उद्देशाने फेकुन दिल्याने, फिर्यादी शेषराव दयाराम शिवनकर वय ४८ वर्ष रा. बेलाटी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. पालांदुर येथे कलम ३१८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

**२) अनैतिक व्यापार चालवीतांनी महिला मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०८/२०१७ चे ००.१० वा. ते ०१.१० वा. दर. पर्यंत यातील आरोपी हिने आपले राहते घरी गराडा येथे वेश्या व्यवसाय करण्याकरिता पिडीत महिला हिला बोलावुन तिच्या कडुन देहविक्रीचा व्यवसाय करण्यास भाग पाडुन येणाऱ्या ग्राहाकाकडुन पैसे घेवुन पिडीत महिले कडुन देहविक्रीचा व्यवसाय व ग्राहकाकडुन मिळालेल्या पैशामधुन आपल्या कुंटुबाचा उदरनिर्वाह करित असते ,अशा मिळालेल्या गोपनीय खबरे वरून तिच्या राहते घरी फंटर पाठविला असता ,पाठवीलेल्या फंटर कडुन गुन्हयातील आरोपीने देह विक्री करण्याच्या ५००/रु च्या २ नोटा असे एकुन १,०००/रु व ०१ नोकिया कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट सिम सह कि. १,०००/रु चा असा एकुन २,०००/रु चा माल मिळुन आल्याने ,सरतर्फे फिर्यादी पोनी. चकाटे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. लाखनी येथे कलम ३,४,५ अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधीनीयम १९५९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. राऊत पो.स्टे लाखनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३)अवैधरित्या घरघुती वापराची गॅस सिंलेडर वापरतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ३०/०८/२०१७ चे २१.३० वा. दर. यातील आरोपी याचे शंकर पान पॅलेस तुमसर नावाचे दुकानाची झडती घेतली असता ,अवैधरित्या घरघुती वापराची गॅस सिंलेडर व २ बर्नर असलेली लोंखडी शेगडी रेगुलेटर सह कि.३,१००/रु ची मिळुन आल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे ३,७ जिवनावश्यक वस्तु अधी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. हावरे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) संगनमत करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून लोखंडी पाऊशीने डोक्यावर मारून जखमी करून जिवेमारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक २९/०८/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील आरोपी क्र.०१ ने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करित असतांनी फिर्यादीने त्यास हटकले असता, यातिल आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी सोबत भांडण करून लोंखडी पाऊशीने फिर्यादीचे डोक्यावर उजवे बाजुला मारून जखमी करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी शैलेश दवळु गभने वय ३२ वर्ष, रा. इंदीरावार्ड मोहाडी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे ३२४,२९४, ५०६, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा पटले पो.स्टे मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) अज्ञात वाहनाच्या धडकेत अनोळखी महीलेचा मृत्यु. :–**

दिनांक २९/०८/२०१७ चे २३.५५ वा. दर. यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने व निष्काळजीपने चालवुन ,अनोळखी स्त्री वय अंदाजे ७० वर्ष हिला धडक मारून गंभिर जखमी करून तिच्या मरणास कारणीभुत होवुन घटनेची माहीती न देता पळुन गेल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. मते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे २७९,३०४ (अ) भादंवि. सहकलम १३४,१८७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मानकर पो.स्टे कारधा हे करीत आहेत.

**६) मोबाइलची चोरी :–**

दिनांक ३०/०८/२०१७ चे १२.०० ते १२.३० वा. दर. यातील आरोपीने फिर्यादीचे खुल्या घरातील बेडरूमचे बेडमध्ये ठेवलेला १ व्हीवो कंपनीचा मोबाईल, कि. ७,४९/रु चा चोरून नेल्याने फिर्यादी अमित शाम लांजेवार वय ३३ वर्ष रा. तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ३०/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. जवाहरनगर, कारधा, तुमसर येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३४ लिटर हातभटटी दारु + १८० किलो सडवा मोहा + साहित्य किंमती ८८५० /रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.